INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांच्या प्रासंगिकतेचे विश्लेषण

**डॉ. गौतम कांबळे,**
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख अर्थशास्त्र विभाग,
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी नागपूर.
मो.नं. ८७८८००२६३०, gautam14161@gmail.com.

**सारांश :**

प्रस्तुत शोधनिबंध आठ भागात विभाजित केला असून राज्य समाजवाद ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती, ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित, कृषी अर्थशास्त्र, भारतातील जल व्यवस्थापन, उर्जा, विकास व नदी खोरे विकास, रुपयाचा प्रश्न, कामगार कल्याण व शेवटी मूल्याकन असे ते आठ विभाग आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल मिश्र अर्थव्यवस्थेपासून भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे होत आहे. या वाटचालीत आर्थिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, स्वास्थ्य व शिक्षण या मूलभूत गरजांबद्दल शासनाची भूमिका संकुचित होत आहे तर दुसरीकडे खाजगी क्षेत्र आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी भूमिका घेतांना दिसत नाही. अशा गंभीर परिस्थिती एक विख्यात अर्थशास्त्रज्ञ व एक राजकीय मुत्सद्दी म्हणून वर्तमान परिस्थितीत डॉ. आंबेडकरांनी केलेले दिशादर्शन किती उपयुक्त राहू शकते यावि विषयीचे विश्लेषण प्रस्तुत निबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**की वर्ड्स** : राज्य समाजवाद, कृषी, उर्जाविकास, कामगार कल्याण.

**गृहित तत्वे :** डॉ. बी. आर. आंबेडकरांनी बहुसंख्य सामान्यांच्या विकासासाठी अर्थचिंतन केले, त्यांचे कृतिकार्यक्रम आजही दिशादर्शक ठरणारे आहेत.

---

**प्रस्तावना :—**

मानवी जीवन जागतिक पातळीवरील तीव्रतेने बदलणाऱ्या मूल्य व्यवस्थेत अधिकाधिक गुंतत चालले आहे. मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरण या संकल्पना उपाय म्हणून जागतिक अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करीत असलेले दिसते. ‘नफा’ ही प्रेरणाच सर्व अर्थकारणाला प्रेरीत करीत असून अर्थव्यवस्था नियमित व नियंत्रित करण्यासाठी पर्याप्त आहे असा विचार स्थापित होऊ पहात आहे. मात्र दुसरीकडे भारतीय व विश्वस्तरावर सुध्दा आर्थिक विषमता मोठया प्रमाणात वाढत असून अनेक देशातील अर्थव्यवस्था स्फीती अपस्फितीच्या चक्राने आर्थिक संकटात वांरवार येत येतांना दिसतात. अशा काळात विकासाची अशीच वाटचाल असते, किंबहुना आर्थिक विकास असाच होत असतो असा दिला जाणारा दिलासा, उपायात्मक कृती — आराखडा देत नाही. अशा संभ्रमित आर्थिक अवस्थेत, जगातील भांडवलशाहीचे सर्वाधिक यशस्वी मानले गेलेले प्रतिमान अगदी

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

जवळून पाहणारे तसेच भारतातील श्रेणीबध्द सामाजिक विषमतेच्याही प्रतिमानाचे स्वत: बळी ठरलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या उच्च शिक्षणानंतर फारसे लिखाण केले नाही. मात्र प्रासंगिक लेखन विपूल प्रमाणात केले आहे, तसेच उच्चशिक्षणासाठी त्यांनी केलेले लेखन सुध्दा जागतिक स्तरावर त्यांचे महत्वपूर्ण योगदान म्हणून चर्चिले गेले आहे, त्यांच्या या योगदानाची वर्तमानातील प्रांसगिकता शोधणे आवश्यक आहे.

अर्थशास्त्रज्ञ म्हणून आंबेडकरांचा विचार केल्यास असे दिसते की त्यांनी नेहमीच गरिबाभिमूख भूमिका घेतली आहे. समन्यायी वितरण हा त्यांच्या आर्थिक विचारांचा केन्द्रबिंदू होता. त्यांच्या चिंतनानुसार आर्थिक स्वातंत्र्य ही सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची जननी ठरते, हा समाजवादी अर्थव्यवस्थेला सहायक ठरणारा विचार मांडलेला दिसतो. ते म्हणतात, ''माणसाच्या जीवनाचे अंतिम ध्येय केवळ भौतिक गरजांची पूर्तता करणे इतके मर्यादित कधीच नसते. केवळ भौतिक गरजांची पूर्तता करणे हे पशूंच्या जीवनाचे अंतिम ध्येय असते. परंतु माणसाच्या जीवनाचे अंतिम ध्येय जोपर्यंत त्याच्या मानसिक व बौध्दिक क्षमतांचा पूर्ण विकास होत नाही तोपर्यंत ते पूर्ण होत नाही.''[१] राजकीय व सामाजिक व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विकासाचे लाभ सर्वांना – समन्यायी पध्दतीने मिळाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. आज आर्थिकदृ टया अविकसित प्रदेशांतील असंतोषातून निर्माण झालेल्या नक्षलवादासारख्या चळवळी देशातील सतरा राज्यांमध्ये, तसेच महारा ट्रातील वेगळया विदर्भासारख्या चळवळी दुर्लक्ष करून किंवा बळाचा वापर करुन दडपून टाकणे, याशिवाय दुसरा सक्षम उपाय व्यवस्थेला सूचत नाही अशावेळी अर्थशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकर निर्णायक योगदान देवू शकतात असे वाटते.

राज्यसमाजवादाचा विचारांची प्रेरणा त्यांनी जर्मन संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञापासुन घेतली असली तरी त्यांच्या विचारांचा केन्द्रबिंदू हा देशातील तळागाळातील समाज व नागरिक हा होता म्हणून अशा अल्पसंख्याकांच्या आर्थिक सरंक्षणाची जबाबदारी किंवा त्यांच्या आर्थिक संरक्षणाचे अस्त्र म्हणून सरकारने जबाबदारी घ्यावी अशा बाजूचे ते होते. त्यांच्या मतानुसार ''अनुसूचित जातींना सरकारने विशेष आर्थिक संरक्षण हे बहुसंख्याकांचा भेदभाव व दडपशाही नष्ट करण्यासाठी दिले पाहीजे.''[२] त्यांनी राज्य समाजवादाची आठ वैशिष्टये सांगितलीत त्यामध्ये शेती व उद्योग व विम्याचे राष्ट्रीयीकरण, सामुदायिक शेती विकास, शेती – उद्योगांना आवश्यक ते भांडवल पुरवण्याची जबाबदारी सरकारची, जलद औद्योगिकरण, खाजगी उद्योगांना मर्यादित ठेवायचे, त्यांच्यावर संपूर्ण जबाबदारी

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

सोपवायची नाही, इत्यादी बाबी दिशादर्शक आहेत. आंबेडकरांनी राज्य – समाजवाद अंमलात आणण्याची सर्व जबाबदारी सरकारवर टाकली व ती बंधनकारक मानली. त्यात शेती सरकारच्या मार्गदर्शन व नियमानुसारच केली जाईल हे स्पष्ट केले. त्यांनी संविधान परिषदेला सादर केलेल्या निवेदनात राज्य समाजवादाची संकल्पना समाविष्ट केली. हा कृतिकार्यक्रम संविधानाच्या मूलभूत अधिकारात समाविष्ट करावा असा त्यांचा आग्रह होता. मात्र तो होऊ शकला नाही. मुलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी आर्थिक संरचना म्हणून राज्यसमाजवाद त्यांनी प्रस्तावित केला होता.[३] पुढे या संकल्पनेला त्यांनी मार्गदर्शक तत्वांचा आधार दिला. मात्र प्रत्यक्षात असा राज्यसमाजवाद अंमलात येवू शकला नाही. विशेष करुन शेतीकडे वर्तमान काळात सरकारचे दुर्लक्ष या राज्यसमाजवादाच्या अभावातुनच आहे, असे म्हटले जावू शकते. राज्य समाजवाद संपत्तीचे समन्यायी वितरण व शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सहायक ठरु शकेल असा आंबेडकरांना विश्वास वाटत होता.

'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' हा पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला त्यांचा शोधप्रबंध होता. पुढे तो सन १९२५ मध्ये पी. एस. किंग ॲडसन' या संस्थेने तो द इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स या नावाने प्रकाशित केला. या प्रबंधाची मांडणी प्रामुख्याने चार भागात करण्यात आली.[४] पहिल्या भागात प्रादेशिक वित्ताची सुरुवात व त्याचा शेवट, केन्द्रीय व प्रांतिक वित्तासंदर्भातील चर्चा; दुसऱ्या भागात प्रादेशिक वित्ताचा विकास; तिसऱ्या भागात प्रांतिक वित्तांची यंत्रणा ज्यात प्रांतिक वित्ताचे स्वरुप, विस्तार व मर्यादांची चर्चा आणि चवथ्या भागात गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९ च्या अंतर्गत प्रांतिक वित्तांची चर्चा केली आहे. प्रबंधाच्या शेवटी आंबेडकरांनी वित्तव्यवस्थेतील बदलाचे स्वरुप, त्यांचे टिकात्मक मूल्यमान केले, या शोधप्रबंधाच्या सभोवती प्रा. एडवीन सेलिग्मन, लॉर्ड जे. एम. केन्स, डी. एच. मॅकग्रेगर व डब्लू. डब्लयू थॅचर हे त्यावेळचे जगप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ चर्चा, टिपणीच्या रुपाने गुंतलेले होते. या प्रबंधात भारतातील शेतकऱ्यांवरील जमीन महसूल किती अन्यायकारक होता हे आंबेडकरांनी सिध्द केले होते.[५] कस्टम डयुटी, सीमा शुल्क हे भारतावर अन्यायकारक आहे हे त्यांनी सिध्द केले. इतकेच नव्हे तर सर्वसामान्य माणसाच्या वापरातील मिठावरील अन्यायकारक करामुळे देखील सर्व सामान्यांची झालेली पिळवणूक आकडेवारीनिशी स्पष्ट केली. आज महसूलाचे अमर्याद प्रमाण वाढले असून सर्वसामान्यांची हा भार वहन करण्याची क्षमता, गरिबी व बेरोजगारीमुळे क्षीण

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

होत आहे व त्याचा अंतिम परिणाम म्हणून आर्थिक विषमता वाढत आहे. देशात व जगातही. अशावेळी आंबेडकरांचे आर्थिक चिंतन, गरिबाभिमूख धोरण ठरविण्यास निश्चितच मदत करु शकेल.

आंबेडकरांनी ईस्ट इंडिया कपंनीचे प्रशासन आणि वित जगासमोर मांडण्याचा निर्भिडपणा दाखवला. कोलंबिया विद्यापीठात एम. ए. साठी १५ मे १९१५ ला एन्शिएंट इंडियन कॉमर्स' हा लघुशोध प्रबंध त्यांनी सादर केला. ग्रंथाच्या शेवटी ते इंग्लडचे भारताला योगदान स्पष्ट करतांना म्हणतात, ''भारताने इंग्लडला खूप काही दिले ; पण इंग्लडकडून भारताला काहीही मिळाले नाही. मात्र त्यांनी भारताला शांती व सुव्यवस्था बहाल केली. पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख करुन दिली, कायदा व न्यायालयांची उभारणी केली. प्रशासकीय स्वरुपाच्या यंत्रणा निर्माण केल्या, यासाठी ब्रिटीशांच्या टीकाकारांनाही त्यांची प्रशांसच करावी लागेल. मात्र आर्थिक अध:पतनाच्या बदल्यात मिळालेल्या पाशवी शांततेचा स्वीकार करावा काय, याचा विचार ज्याचा त्याने करावा.[६] वयाच्या २४ व्या वर्षी आंबेडकरांची आर्थिक चिंतनातील समज व क्रांतिकारकता वर्तमानकालीन संशोधक – अभ्यासकांना प्रेरणादायी तर आहेच मात्र महात्मा गांधीच्या 'दांडी यात्रेच्या' १५ वर्षापूर्वी आंबेडकरांनी ही मांडणी केली होती. तसेच जागतिकीकरणाच्या आजच्या प्रवाहात नफ्यासाठी सर्व काही करु पाहणारे उद्योजक/विनियोजक भांडवल भारतात गुंतवल्यानंतर काही कालावधीनंतर नफ्याच्या स्वरुपात अमर्याद भांडवल घेवुन जाणार आहेत व त्याचा परिणाम परकीय चलन देशाबाहेर जावून अपस्फिति घट्ट पाय रोवण्याची शक्यता आहे, हे समजुन घेण्यासाठी आंबेडकरांचे १०० वर्षापूर्वीचे योगदान निश्चितच मौलिक ठरते.

भारतीय शेती, शेतकरी व शतमजूर यावर आंबेडकरांनी प्रासंगिक पण मौलिक भाष्य केले. राज्य समाजवादातील शेतीचे स्वरुप, स्मॉल होल्डिंग इन इंडिया, मुंबई प्रांतिक विधीमंडळावर मोर्चा (१९३८), अनुसूचित जाती—जमातींचा विकास व शेतीचे पुनर्वाटप, स्वतंत्र मजूर पक्षाचे आर्थिक धोरण व शेती, खोती निर्मूलन विधेयक व पीक विमा योजना हे त्यांचे भरीव योगदान म्हणता येईल. आंबेडकरांच्या काळात जे शेतीचे प्रश्न होते ते आजही आहेत. शेतीची उत्पादकता, शतमालाला भाव हे सुध्दा मुद्दे आहेत. भारतीय शेतीतील लहान धारण क्षेत्रावर उपाय म्हणून आंबेडकरांनी शतजमिनीचे एकत्रीकरण व सामुदायिक शेतीची कल्पना मांडली होती. शेतकऱ्यांच्या विदर्भात वाढलेल्या आत्महत्या थांबविण्यासाठीसुध्दा हे उपाय अधिक

I J R S S I S, Vol. V, January 2017: 230-236 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

परिणामकारक ठरू शकतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी अमेरिका—युरोपमधून उत्युच्च शिक्षण घेतलेला प्रकांड विद्वत्ता असलेला तरुण अभ्यासक — संशोधक अशी ओळख खरे तर व्हायला पाहिजे होती. आजपर्यंतही ती होवू शकली नाही. त्यांच्या चिंतनानुसार शेतीकडे दुर्लक्ष करता येवू शकत नाही. शतीच्या लहान धारणक्षेत्रांचा शेतीच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होत आहे हा गंभीर इशारा त्यांनी दिला.[७] तो आज तर अधिक तीव्रतेने लागू पडतो असे वाटते. पीक विमा योजनेबद्दल आंबेडकर सुचवतात, ''भारत देश हा अगदी पूर्वीपासून शेतीप्रधान देश आहे व

शतकऱ्यांना संरक्षणाची जेव्हा गरज असेल तेव्हा पीक विमा योजनेद्वारे संरक्षण देण्यात यावे. ज्याद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक दैन्यावस्थेतून बाहेर काढता येईल. तसेच दुष्काळाच्या भितीतुन त्यांची मुक्तता करता येईल.''[८] आज ग्रामीण लघु—सीमांत शेतकऱ्यांला अनुदानाच्या रुपात तसेच गरिबी रेषेवर जीवन जगणाऱ्या वंचित समुहाला वाढत्या शतमाल किंवा मजुरीच्या रुपाने संपत्तीचे न्याय वितरण हा मुद्दा आहेच व त्याला शासनाचे प्राधान्य दिसत नाही.[९] अशा स्थितीत आंबेडकरांचे शेतीप्रश्नांबाबतचे चिंतन सरकारला 'मार्गदर्शक तत्वाची आठवण करुन देऊ शकण्याचे सामर्थ्य बाळगते.'

भारतातील जल व्यवस्थापन, ऊर्जा विकास आणि नदी खोरे विकासाचे जनक अशी आंबेडकरांची नवी ओळख स्थापित होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील बहुउद्देशीय नदी खोऱ्यांचा विकास, वाया जाणाऱ्या जलसंपत्तीच्या नियोजनाचा प्रयत्न व त्याद्वारे शेतीसाठी जलसिंचनाच्या सुविधांची निर्मिती, विद्युत ऊर्जा निर्मिती व तिचा विकास यासाठी त्यांनी दूरदृष्टीने पाया घातला. आंबेडकरांची व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात ९ जुलै १९४२ ला मंत्री म्हणून निवड झाली, २० जुलै १९४२ ला त्यांनी पदभार स्वीकारला.[१०] ते मजुरमंत्री झालेत. त्यांना जलसिंचन व उर्जा ही खातीसुध्दा देण्यात आली. त्यात त्यांनी केले कार्य नेत्रदिपक आहे. जी दामोदर नदी बिहार व बंगाल प्रांतावरील 'दु:खाचे संकट' मानली जात होती. ती नदी आज आजच्या झारखंड व बंगाल राज्यातील व आसपासच्या इतरही जनतेसाठी जीवनदायिनी झालेली आहे. याचे संपूर्ण श्रेय डॉ. आंबेडकरांना जाते. विशेष करुन दामोदर खोरे बहुउदृदेशिय विकास प्रकल्पात एकूण चार विशाल धरणांची निर्मिती करण्यात आली आहे.[११] नद्यांचे एकत्रीकरण करुन बहुउद्देशिय योजना कशी राबवता येईल, यासाठी...पूर नियंत्रण, जल वाहतूक, जलसिंचनाच्या सुविधा व पाण्याचा निचरा करण्यासंबधी नियोजन, भूसंधारण, उर्जा

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

विकास यांचा विचार करावा लागेल असे आंबेडकरांचे मत होते.[१२]

रुपयाचा प्रश्न (उगम व उपाय) हा शोधप्रबंध आंबेडकरांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या डॉक्टर व सायन्स या सर्वोच्च पदवीसाठी १९२१ मध्ये पूर्ण केला. या दृष्टीने 'रुपयाचा प्रश्न' म्हणजे रुपयाचे मूल्य स्थिर ठेवणे होय. त्याचे मूल्य स्थिर असेल, तर दैनदिन व्यवहारांतील वस्तूंच्या किंमती स्थिर राहून महागाईला आळा बसू शकतो. रुपयाचे मूल्य स्थिर राहिले नाही, तर सतत वाढणारी महागाई रोखता येणार नाही व गरीबांची पिळवणूक थांबवता येणार नाही.[१३] आज देशात, बाबासाहेब आंबेडकर म्हणत होते ते आजही प्रासंगिकच आहे.

देशात सत्तर वर्षाच्या काळात जे कामगार कायदे — योजना अस्तित्वात आणण्याचा आधार आबेडकरांचे कामगारावि यीचे चिंतन, चळवळ कर्तृत्व आहे. यात महार वतन दुरुस्ती विधेयक, मुंबईतील गिरणी कामगारांच्या प्रश्नावर संघर्ष, अखिल भारतीय जी. आय. पी. रेल्वे परिषद, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना व कार्य, श्रममंत्री म्हणून केलेले कार्य असे विशाल कर्तृत्व समोर येते. कामगारांच्या प्रश्नाविषयी समज वाढवण्याची गरज स्पष्ट केली. त्यांच्या मते, कामगार नेतृत्वाने कामगारांच्या प्रश्नांविषयी माहिती जमा करुन अभ्यासपूर्ण मांडणी केली पाहीजे.[१४] त्यांनी व्यक्त केलेली ही खंत आजसुध्दा प्रासंगिक आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

**मुल्यांकन :—**

आंबेडकरांचे आर्थिक चिंतन सर्वहारासमाजाच्या हिताचे आहे. देशातील सपंत्तीचे समान वाटप याबाबत ते आग्रही होते, सर्वसामान्यांच्या हिताचा विचार करता आंबेडकरांनी सांगितलेला समान वाटप आजही तितकाच प्रासंगिक आहे, असे म्हणता येईल. त्यांचा 'राज्य समाजवादाचा कृतिकार्यक्रम हा निश्चितच क्रांतिकारी आहे. देशातील संपत्तीचे समान वाटप याबाबतीत ते आग्रही होते. सर्वसामान्यांच्या हिताचा विचार करता आंबेडकरांनी सांगितलेला समान वाटप आजही प्रासंगिकच आहे. महसुलाच्या रुपाने जमा केलेले वित्त किती अन्यायकारक आहे याचे केलेले त्यांचे विश्लेषण आजही गरजेचे आहे असे वाटते. भारतीय शेतीची — तिच्या समाजातील सामाजिक व आर्थिक पुर्नरचना किती आवश्यक आहे, हे समजणे गरजेचे आहे. त्यांनी जगासमोर मांडलेला रुपयाचा प्रश्न सर्वप्रकारचे शोषण घडवून आणतो, हा त्यांनी काढलेला सार आजही महत्वाचा वाटतो. मजूरमंत्री/कायदेमंत्री असतानाचे श्रमिकाभिमूख कायदे आज मोडित काढण्याचे प्रयत्न जागतिकीकरणात होत असले तरी त्या कायदयाची गरज मुळीच संपत नाही, उलट

I J R S S I S, Vol. V, January 2017: 230-236 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

भविष्यात ती अधिक प्रासंगिकच ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

**संदर्भ :—**

१) डॉ. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पीचेस व्हॉल्यूम—६ (१९८९), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई शेवटचे पृ ठ.

२) डॉ. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पीचेस, व्हॉल्यूम—१ (१९७९) एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई, पृ. ३८३

३) डॉ. आल्टे, इंद्रजित, अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (२०१६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद ४३१००४, पृ. ३९

४) डॉ. आंबेडकर,बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पिचेस, व्हॉल्यूम—६ (१९८९) एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई. पृ. ५७

५) तत्रैव, पृ. ७४

६) डॉ. आल्टे, इंद्रजित, अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (२०१६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद ४३१००४, पृ. ७१

७) डॉ. आंबेडकर,बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पिचेस, व्हॉल्यूम—१ (१९७९) एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई. पृ. ४५५

८) तत्रैव, पृ. ४८०

९) गौतम, कांबळे, 'जमीन सुधार व दलित आदिवासी' (२०१३), लोक वाङ:मय गृह, भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई—२५, पृ. २९६

१०) डॉ. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पिचेस, व्हॉल्यूम—१० (१९९१), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई. पृ. १०

११)https/en.wikipedia.okg.wiki.damodar vaily corp., page no. 4

१२) डॉ. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पिचेस, व्हॉल्यूम—१० (१९९१), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महारा ट्र, मुंबई. पृ. ३०७

१३) डॉ. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पिचेस, व्हॉल्यूम—६ (१९७९), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई. पृ. ३२९

१४) डॉ. आंबेडकर, बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज ॲण्ड स्पिचेस, व्हॉल्यूम—१० (१९९१), एज्युकेशन डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई. पृ. ११२